ISSN: 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME - 7 | ISSUE - 4 | MAY - 2017

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

# प्रा.डॉ.परशुराम जिमेकर : एक प्रेमळ माणूस


**प्रा.डॉ.राजकुमार खंडू मस्के**
विभागप्रमुख, पदवी व पदव्युत्तर , मराठी विभाग, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, जि.लातूर.

***प्रस्तावना :***

प्रा.डॉ.परशुराम जिमेकर आणि माझा सहवास कमी; पण सुखाचा नि सुंदर होता. मराठी विभागात काम करीत असताना पी.एल. आपल्या विचाराच्या परिमळाने आम्हांस प्रसन्न करीत असत. माझ्यापेक्षा वय, ज्ञान, अनुभवाने मोठे आहेत; मात्र आपल्या थोरपणाचा गर्व कधीही त्यांनी दिसू दिला नाही. मूळ झरा प्रेमाचाच ! तो कधी आटू दिला नाही, अथवा मनातल्या मळमळीने गढूळ होऊ दिला नाही. प्रेमाच्या सरितेचा प्रवाह आज आम्ही एकत्र नसलो तरीही दुथडी शांतपणे वाहात आहे. पी.एल. विद्यापीठात गेले; पण अर्ध्या हळकुंडाने पिवळे झाले नाहीत. इतरांना दुःख होईल असे वर्तन सरांनी केल्याचे मी अनुभवले नाही. कोणाचे फाजील गोडवे गाणे त्यांना जमले नाही. ताकास जाऊन भांडे लपविणे, राईचा पर्वत करणे गुरूजींच्या स्वभावतच नव्हते. 'अहो रूपं अहो ध्वनि' या प्रकारातही ते केव्हाच रमले नाहीत. सरळ, प्रेमळ, निर्मळ नि निर्मत्सरी माणूस म्हणून माझ्या मनात घ्पीएलजीङ ने कायमचे घर केले आहे.

''कळवळा हा गुणच असा आहे की, तो आपस्वार्थ मागे टाकतो आणि परस्वार्थासाठी आपले बल-पुण्य खर्ची घालतो. परमेश्वराने सर्वांच्या अंतरात हा गुण थोड्याबहुत प्रमाणात ठेवलेला आहे; पण पुष्कळ माणसे त्याचा अंकुर वाढूच देत नाहीत. त्यामुळे त्यांच्या अंतरंगात सहानुभूती म्हणतात ती उत्पन्नच होत नाही.''[१] महाविद्यालयात किंवा बाहेरचे ठिकाण कोणतेही असो पी.एल.जीचा कळवळा मी अनेक वेळेस, अनेक प्रसंगी अनुभवलेला आहे. दैन्य, दारिद्र्य, अज्ञान व आपत्तींच्या संकटात सापडलेल्यांबद्दल सरांनी सढळ हाताने मदत केली. सहकाऱ्यांच्या यशापयशात सहभागी झाले. विद्यार्थ्यांच्या आजारपणात त्यांची मनोभावे शुश्रूषा केली. शुष्कोपचाराला सरांनी थारा दिला नाही. देता येणे शक्य आहे, तर देत जावे. घेता येणे शक्य आहे, ते घेतच जावे याच वाटेने सर गेले नि जाताहेत. घरी येणाऱ्यांचे आतिथ्य आनंदाने केले. याक्षणी दिनांक स्मरत नाही; पण वार आठवतो. रविवार हा विश्रांतीचा दिवस सरांनी सहकाऱ्यांच्या आणि कुटुंबियांच्या सहवासात घालविला. मला मका, उडिद, मूग, बाजरी, सोयाबीन, हरबभरा, मटकी या सात धान्याची खमंग भाकर करून खाऊ घातली, ती चव आजही ताजी आहे.

वर्तमानकाळ मैत्रीच्या दृष्टीने अत्यंत अवघड आहे. पैसा, प्रसिद्धी, प्रॉपर्टी या तीन 'प' वर प्रेम करण्याचा काळ आहे. मैत्रीची वेळ त्यागाच्या पाण्यावरच टवटवीत राहाते. प्रेमाचे, निष्ठेचे खत घातले की मैत्रीची वेल फुलांनी डवरते. प्रेम, मत्री हल्ली महाग झाले आहे. 'सुहृद' दुर्मिळ आहे. स्वतःवरही हे अवलंबून आहे ''आपले अंतःकरण शुद्ध असेल, भावकोमल असेल, प्रामाणिक असेल तरच सज्जनाशीं मैत्री होते, आणि ती वाढीस लागते.''[२] (तत्रैव, पृ.३७) 'पीएलजीं' चे अंतःकरण शुद्ध, भावकोमल असल्यामुळेच आमच्या मनाच्या तारा जुळल्या. साचलेलं मन मोकळं करण्यासाठी, वेदनेने विव्हळणाऱ्या मनाला आविष्कृत करण्यासाठी सुखदुःखाला वाटण्यासाठी एकमेकांचा आधार होत होतो. वयाने माझ्यापेक्षा 'पीएलजी' मोठे; पण वयाच्या मोठेपणासारखी मैत्रीही मोठीच. उच्चशिक्षित माणसांचे विचार उच्च असतात; मात्र आचार अशिक्षितांना लाजवणारा असतो. 'पीएलजीं' चा विचार आणि आचार मोठा होता नि आहे. मैत्रीचा मृत्यू न आवडणारा माणूस म्हणून त्यांची ओळख आहे. निष्कपट मित्र



लाभला या दृष्टीने मी भाग्यवंत आहे. सरांचे मन:पूत वागणे मला व आमच्या मित्रांना ते मनोरम वाटायचे. सतत संपर्क ठेवणारा, विभागाविषयीची आपुलकी ठेवणारा व मित्रांच्या प्रगतीसाठी मदत करणारा दुर्मिळ मित्र म्हणजे 'पीएलजी' होय. मित्र जोडतच जावे. द्रोह करू नये. देण्यासाठी सदैव पुढे यावे, हे 'पीएलजी' ने आपल्या वागण्यातून दाखवून दिले. घराशेजारी कडाक्याची भांडणे सुरू झाली. मला काय त्याचे म्हणून 'पीएल' घरात न बसता रात्री दोन वाजता माझ्या घरी येवून मला त्या भांडणाची कल्पना दिली. दोघांनी तो वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. घरोघर मातीच्याच चुली असतात, याची त्यांना जाणीव होती. कोणताही, कसलाही संघर्ष निर्माण होऊ नये, यासाठी ते सतत प्रयत्न करीत असत. मित्र मनाने मोठा असावा. धनवान नसेलही; पण तो गुणवंत हवा. 'पीएलजी' मित्र म्हणून महामेरूच आहे.

शिक्षक महाविद्यालयात आणि समाजात सतत शिकविणारा असला पाहिजे. ज्ञानपरायण आणि समाजपरायण असावा. विद्यार्थ्यांना शिकविण्याबरोबरच समाजशिक्षणाचे कार्य त्याने एक परमकर्तव्य म्हणून निरपेक्षपणे केले पाहिजे. आजचे सर्व क्षेत्रातले कुचित्र शिक्षक सर्वच स्तरांतून संपल्याचे द्योतक आहे. वर्तमान दुर्दशेला अनेक घटकांबरोबर शिक्षकांच्या जबाबदारीचा वाटा मोठा आहे. स्वांतसुखाय, कुटुंबपिपासू, समाजविन्मुख वृत्तीचा अध्यापक समाज, संस्कृती आणि राष्ट्राला विनाशाकडे घेवून जातो. पीएलजी वर्गात विद्यार्थ्यांबरोबर एकरूप होत असत. तसेच सामाजिक क्षेत्रातील प्रबोधनाच्या वर्गातही ते तल्लीन होत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णा भाऊ साठे, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर व दलित, ग्रामीण साहित्य, ललित साहित्यावर त्यांनी खेडोपाडी अभ्यासपूर्ण व्याख्याने दिली. मानधनाची अपेक्षा न ठेवता रात्रीअपरात्री पायी माझ्याबरोबर प्रवास केला. मानापमानापेक्षा समाजाला वाव मिळावा. समाजाची शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक उंची वाढावी या प्रांजळ हेतूने सरांनी उदगीर व परिसरात प्रबोधनाचा जागर मांडला. अनेक वेळेस थंडा फराळ स्वीकारावा लागला. अज्ञानाच्या, विषमतेच्या वणव्यात दलित, उपेक्षितांच्या, आदिवासींच्या अनेक पिढ्या बरबाद झाल्या आहेत म्हणूनच दलितांच्या, ज्ञानवंचितांच्या अस्मितेचे निखारे फुलविण्याचे कार्य सरांनी केले. त्यांच्या दुर्दम्य महत्त्वाकांक्षा जागृत केल्या. जुनाट परंपरेला ठोकरण्याचे सर्व तरूणांना वेड लावले, तसे नवनिर्माणाचे सामर्थ्य समाजमनात पेरले. हिमालयाची उत्तुंगता दाखविली. सह्याद्रीच्या कणखरपणाची जाणीव करून दिली. "एक ज्योत पेटली तर इतर न पेटलेल्या वातींना बळ लाभते. जागृतीची एक लाट उचंबळून आली तर प्रवाहाला जिवंत आवेगाचा स्पर्श होतो."[३] (डॉ.निर्मलकुमार फडकुले, साहित्यातील प्रकाशधारा, पृ.७६)

पीएलजींनी संघर्षाच्या अनेक मशाली पेटविल्या. कवी, कथाकार, कादंबरीकार, नाटककाराला नवनिर्मितीसाठी काय करावे लागते याविषयीचे भान ग्रामीण भागातील प्रतिभावंतांना दिले. म.फुले, राजर्षी शाहू महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांनी क्रांतिची बीजे समाजमनाच्या भूमित जाणीवपूर्वक पेरली आहेत; परंतु समाजविघातक रूढी व परंपरेच्या वैशाखी वणव्यामुळे या विचारांचे बीजांकुर फारसे पाहता आले नाहीत. जे अंकुरले त्यांची तनमाजोरी वृत्तीने वाढ होवू दिली नाही. उपरोक्त युगपुरूषांच्या प्रयत्नांचा फायदा असा झाला की, संपूर्ण क्रांतीसाठी प्राणार्पण करणाऱ्या शिपायांची फौज उभी राहिली. क्रांतीला विचाराची शक्ती लागते. विचारांच्या पेरणीसाठी प्रेरणेची व प्रतिभेची गरज असते. प्रेरणा आणि प्रतिभेला मानुषतेची जोड हवी. क्रांतीला लायक नायक तयार व्हावा म्हणून निर्भेळ प्रेरणेची व नवनिर्मिती सकस होण्यासाठी निरंकुश प्रतिभेची गरज असते. पीएलजींनी समाजोद्धारक सैनिकांना बांधिलकीची प्रेरणा दिली. प्रतिभेच्या कुंचल्याने समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी सम्यक दृष्टी दिली. समाजपरिवर्तनाच्या लढाईत आणि युगंधरांनी पेरलेल्या क्रांतीच्या बीजाला वाढविण्यात पीएलजींचा खारीचा वाटा नाकारता येणार नाही.

जात, धर्म व पंथातीत पीएलजी .... असेच त्यांच्या बाबतीत म्हणावे लागेल. जात हा आजच्या युगातील शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रातील जिवंत शब्द बनला आहे. माणूस जेवढा मोठा तेवढा त्याच्या जातीचा अड्डा मोठा. प्रतिगाम्यांना जातीयवादी म्हणून शिक्का मारणारे पुरोगामी प्रतिगामींना लाजवेल असा जातीयवाद करतात. महामानवांच्या विचाराचाराचे मारेकरी जसे प्रतिगामी तसेच पुरोगामीही आहेत. गरीब माणसांचे शोषण करीत असताना तथाकथितांना आपण पाहतो व अनुभवतो; त्यांचे कळवळ्याचे भाषण ऐकतो तेव्हा त्यांच्या वदतोव्याघाताची, नक्राश्रूची प्रकर्षाने जाणीव होते. डोळ्यात तेल घालून हाडाची काडं, नेत्राचा दिवा व रक्ताचं पाणी करून महामानवांनी फुलविलेल्या मळयाला, स्वतःच्या स्वार्थासाठी आग लावली; अक्षरशः तुकडे तुकडे केले. जात, धर्म, पंथाच्या संदर्भात कलमकसाई भूमिका पीएलजींनी घेतली नाही. जात, धर्म व पंथाच्या वर्तमान डबक्यात ते अडकले नाहीत. "जातीपातींची, स्पृश्यास्पृश्यांची, ब्राह्मण-ब्राह्मणेत्तरांची, हिंदु-मुसलमानांची शेकडो डबकी आहेत. गुजराती, महाराष्ट्री व बंगाली ही प्रांतीय डबकी शिवाय आहेतच. डबक्यात राहणाऱ्यास प्रसन्नतेचा प्रसाद प्राप्त होत नसतो."[४] पीएलजी कोणत्याच डबक्यात अडकले नाहीत. स्वतःच्या मुलाचे नाव 'चर्चिल' ठेवले.

दलितांमधील भेदाला सरांनी त्रास सोसून सुरूंग लावला. आगीत तेल ओतणाऱ्यांचा कपाळमोक्ष जाणीवपूर्वक केला. श्वानपंथीयांची कणिक तिंबण्याचा आळस आम्ही कधीही केला नाही. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये एकोपा निर्माण करण्यात आमचा कस लागला. अनेकदा आमच्यावर कानाला खडा लावण्याची वेळ आली; पण शतकार्य सोडले नाही. काम केले आहे म्हणून राईचा पर्वत कधी केला नाही. शिक्षकाला जन्माने त्याची जात चिकटते; पण कर्तृत्त्वाची स्वतंत्र चिरेबंदी इमारत त्याला बांधता येते. शिकविणे, शीलवंत असणे विद्यार्थी व समाजासमोर आदर्श ठेवणे, कटकट न करता कर्तव्यभावाने कर्म करणे हीच शिक्षकाची खरी ओळख होय. शिक्षकाची जात सूर्याची, धर्म शिल्पकाराचा आणि

पंथ सत्य,शिव, सुंदराचा प्रचारकाचा. 'पीएलजी' नी कमळाचे तत्त्व पाळले पाण्यात असूनही स्वच्छ व सुंदर ! आर्तता, वात्सल्य, ऋतुज्वाचा क्षणोक्षणी मला प्रत्यय आला. निंदा, कुत्सितपणा, वितंडवादात ते कधी अडकले नाहीत. जातधर्मपंथातीत माणूस म्हणून पीएलजींची ओळख आहे.

प्रसन्न मनाचा प्राध्यापक म्हणून 'पीएलजी' आम्हा मित्रांमध्ये सुपचिरित आहेत. मानवी मन गूढ, चंचल आहे. मनाचा व्यापार कळत नाही. मन दिसत नाही; पण मन म्हणेल तसं माणूस वागतो. मनाविरुद्ध काही घडले, तर नाराज होतो. आपल्या मनासारखे झाले म्हणजे तो आनंदी होतो. मनाला आपल्या ताब्यात ठेवणारे मोठेच असतात. बाह्यता शांत दिसणाऱ्या माणसांच्या मनात तळाला ज्वालामुखी असतो, हे लक्षात येत नाही. मनाला आवर घालता येत नाही. मन माणसांना गुलाम बनविणारे; मात्र माणूस मनाला आपल्या ताब्यात ठेवू शकत नाही. मन लहान नि महान असते. सुखाचे शिखर व दु:खाचे पहाड मनाच्या शिडीमुळेच सर करता येतात. आहे त्यात, आहे तसे स्वीकारायला मन तयार झाले की सुखाचा महासागर वाट्याला येतो; परंतु असेचका? मलाच का नाही? माझेच खरे आहे, मलाच सारे कळते, यातून दु:खाचा डोंगरच समोर उभा राहातो. पीएलजीने मनाला भरकटू दिले नाही. अवाजवी अपेक्षा व्यक्त केली नाही. अनेक प्रसंगी मनाचा मोठेपणा त्यांनी दाखविला. पटले नाही तेव्हा पेटविण्याची भाषा केली नाही. मनाचे मंदिर मलिन होऊ दिले नाही. मन मारणे हा प्रकार त्यांच्याकडून घडला नाही. मन मानेल तसे ते वागले नाहीत, मन कधी विटू दिले नाही. मनाला मांडेखाण्याची व्यर्थ इच्छा होऊ दिली नाही. सरळतेने काम करण्यावरच त्यांचा भर होता. विभागाचे, महाविद्यालयाचे काम मन दुग्ध्यात पडू न देता केले. वर्गात असो की बाहेर असो पीएलजीने मनाला ब्रेक लावला. मनोनीत कामावर त्यांचा विशेष भर असतो. मनकवडा कवी, प्रसन्न मनाचा प्रज्ञावंत प्राध्यापक, संयमी शेजारी, सूक्ष्मदर्शी व संवेदनशील कार्यकर्ता अशा विविध भूमिकेत मी त्यांना पाहिले आहे. नाराजी हा शब्द मला पीएलजींच्या कोशात सापडला नाही. चेहरा अस्सल ठेवला, त्याचा मुखवटा होऊ दिला नाही. मन भरून खाणे, मन मरून हसणे, मन भरुन दुसऱ्याला खाऊ घालणे, मन भरुन फिरणे असं सगळं भरुनच असे !

सरांचा छालछबीली स्वभाव असला तरी त्याला लय होती, त्यामुळे छाती फाटण्याची वेळ त्यांच्यावर आली नाही. वाचन, गायन, नवनिर्मिती करणे, नर्मविनोदाच्या कारंज्या उडविणे, आवडणाऱ्या गोष्टीचे ते चर्चित चर्वण मन:पूर्वक करीत असत. वर्गातील विद्यार्थ्यांचे आपण छायानायक आहोत याची त्यांना जाणीव होती. म्हणूनच विद्यार्थ्यांप्रती व सहकाऱ्यांसोबत छद्मीपणाने ते वागले नाहीत. छिद्रान्वेषण वृत्तीला थारा दिला नाही. महाविद्यालयातील माझे पीएलजी बरोबरचे संबंध सौहार्दपूर्णच राहिले. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे पीएलजी प्रमुख असूनही त्यांनी स्थिर बुद्धीला दृष्ट लागू दिली नाही. स्वभावातील स्निग्धता कमी होवू दिली नाही. उदगीर सोडून औरंगाबादला गेले; पण संवाद संपू दिला नाही.

**पीएलजी माणूसवेडा प्राध्यापक :**

प्राध्यापक, शिक्षक समाजाला दिशा देणारे, शिकविणारे हाडाचे कार्यकर्तेच असतात. समाज दिशाहीन झाला, तर दोष प्रथम शिक्षकांचा नंतर इतर घटकांचा. माणसात रमण्याचे अभिजात वेड शिक्षक प्राध्यापकांना लागले पाहिजे. मी आणि माझी प्रगती हे जसे खरे आहे. तद्वतच माझे समाजाशी देणे आहे आणि मी ते दिले पाहिजे हा बांधिलकीचा भाव नष्ट होत चालला आहे. ज्या शिक्षक-प्राध्यापकाला माणसात रमण्याचे वेड आहे तो शिक्षक, प्राध्यापक अमर होतो. सत्ता, संपत्ती, पैसा यांच्या संचयात रमणारे नव्हे बुडालेले अनेक विद्वत्जन आपल्या सभोवताली आहेत. आपल्या सभोवताली अशीही माणसं आहेत की ज्याकडे माणसांच्या संपत्तीशिवाय दुसरे काहीच नाही. पीएलजी असाच एक माणूसवेडा मनुष्य ! माणसं भेटल्यानंतर न सोडणारा. त्यांचे आदरायित्य मनोभावे करणारा, त्यांच्या हरेक कामात निरपेक्ष मदत करणारा, लहान, मोठा असा कोणताही भेदाभेद न करणारा, प्रत्येकाला पारखणारा आणि सर्वांना स्मरणार्थ ठेवणारा माणूसवेडा माणूस म्हणजे पीएलजी होय. सरांच्या संग्रहात अनेकरंगी माणसं आहेत. सामान्या-सामान्यांची मांदियाळी सरांच्या अधिकोशात आहे. सरांना सहज एकदा मी विचारले होते की, सर माणसांचे वेड तुम्हाला केव्हापासून लागले नि कुठपर्यंत राहणार ? सरांनी उत्तर दिले, 'जीवात जीव असेपर्यंत !' माणसांची वस्ती निर्माण करणे, त्या वस्तीचा विस्तार करीत जाणे हा सरांचा धर्मच ! अनेक तऱ्हेची माणसं सरांना भेटली; पण सरांनी पाठ कधीही फिरविली नाही. भेटेल त्याला ताठ मानेने चालायचा संदेश दिला. ताठ कणा ठेवूनच जगण्याची हाक दिली. माणसांसोबत माणसांची आरती गाईली. मराठवाड्यातला एका खेड्यातील माणूस विद्यापीठाच्या पदव्युत्तर मराठी विभागाचा प्रमुख होतो ही बाब प्रेरणा देणारी आहे. माणसांचे जाळे विणणारा निगर्वी प्राध्यापक म्हणून आमच्या मनावर अमीट ठसा सरांनी उमटविला आहे. स्नेहाची वेल सुकू दिली नाही. ज्ञानाचा, मायेचा पान्हा कधी चोरला नाही. सौंदर्यदृष्टी, सहृदयता, कर्तव्यनिष्ठा करपू दिली नाही.

सरांकडे उदगीरहून एखादा विद्यार्थी औरंगाबादला पाठविला तर त्याला ते जिव्हाळ्याची वागणूक देतात. घरी ताईंची मोलाची साथ मिळाल्यामुळे सर सुकले नाहीत की थकले नाहीत ! भडक, भंपक, बटबटीतपणाचा प्रत्यय कधी आला नाही. साधेपणा, सदाचार, सद्विचार, सहानुभूती, पावित्र्य, चारित्र्य या गुणांची सदैव मनोभावे उपासना केली. शिष्टयंमत असो की सामान्य असो कोणाचा मनोभंग सरांनी केला नाही की सहकाऱ्याबरोबर वागतांना व बोलतांना इतरांचा अधिक्षेप कळत न कळत केला नाही. कुत्सितता, कुभांडखोरपणाची प्रचिती या कुलभूषणाकडून मला आली नाही. मी वयाने लहान असल्यामुळे मला ते समजून घेत असत व कानमंत्रही देत असत. बऱ्याच वेळेस मला सर

कामधेनू वाटायचे. बऱ्याच दिवसांनी भेटलो तेव्हा मायेची आर्द्रता त्यांनी कमी होवू दिली नाही याची जाणीव झाली. ऋणानुबंधाचा दिवा विझू न देता अभिजात दोस्त ही वर्तमानयुगातील अप्राप्य ! अशा प्रामाणिक, प्रेमळ मित्राला व त्यांच्या संपूर्ण परिवाराला दीर्घ आयुरारोग्य लाभो.

विद्यार्थ्यांच्या, समाजाच्या कल्याणासाठी धडपड करणाऱ्या नि:स्पृह प्रेमळ मनाच्या आमच्या गुणी मित्राला उज्वल उदयासाठी मन:पुर्वक शुभेच्छा !

**संदर्भसूची :**

१) पं.महादेवशास्त्री जोशी : कल्पवृक्ष, इंद्रायणी साहित्य, पुणे पृ.३०
२) तत्रैव, पृ.३७
३) डॉ.निर्मलकुमार फडकुले : साहित्यातील प्रकाशधारा, पृ.७६
४) साने गुरुजी : साने गुरुजींचे निवडक निबंध संपा.विजय खोले, पृ.२६